Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN vINTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY QUARTERLY
RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with OKEN Scanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877
E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5** (www.sjifactor.com)

Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.


Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Prof.Virag Gawande**
Director Aadhar Social Research &
Development Training Institute, Amravati.

**Prof.Dr.Sanjay J. Kothari**
G.S.Tompe Arts Comm.,
Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Prof.Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj Art's Comm,
Sci Collage Walgaon Dist. Amravati

**Dr. Bhagyashree A. Deshpande**
Associate Professor
Dr. Panjabrao Deshmukh College of Law, Amravati.

**Dr. Dhnyaneshwar Yawale**
Sant Gadge Maharaj Mahavidyalay Walgaon,
Dist. Amravati.

**Dr. Kundan Ajabrao Alone**
Ramkrushna Mahavidyalaya,
Darapur Dist. Amravati.

**Dr. Pawan Ramesh Naik**
H.O.D. Dept. of Commerce,
Kewalramji Harde Mahavidyalaya,
Chamorshi. Dist-Ggadchiroli.

**Dr. Sandip B. Kale**
HOD & Assistant Professor, Department
of Political science, Yeshwant Mahavidyalaya,
Seloo, Dist. Wardha



PUBLISHED BY

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)


Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजींचे देशाच्या जडणघडणीतील योगदान<br>**प्रा. डॉ. सौ. उज्ज्वला रा. पाटील** | १-५ |
| २ | गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांची वैशिष्टे<br>**प्रा. डॉ. सुचिता एस. ढेरे** | ६-८ |
| ३ | सार्कचे पर्यटन क्षेत्रातील कार्य<br>**प्रा. संतोष महादेव घुगे** | ९-१२ |
| ४ | बालविवाहानिर्मीत बाल मजुरी एक समस्या एक वास्तवता<br>**प्रा. डॉ. निना सा. चवरे** | १३-१७ |
| ५ | शाहू महाराजांच्या विचार आणि कार्याचा भारतीय राज्यघटनेवर पडलेला प्रभाव<br>**प्रा. डॉ. एन. बी. पोहकर** | १८-२७ |
| ६ | संत कान्होपात्रा<br>**प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे** | २८-३२ |
| ७ | पर्यटनक्षेत्र : भारतीय अर्थव्यवस्थेतील एक संधी<br>**प्रा. सतिश हरलाल पारधी** | ३३-३७ |
| ८ | मराठी प्रयोगशील कादंबरी<br>**प्रा. मोहन बाबूराव चव्हाण** | ३८-४३ |
| ९ | महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी योजनेचे अध्ययन<br>**डॉ. दिनेश वा. निचित** | ४४-४८ |
| १० | मानवेंद्रनाथ रॉय आणि नवमानवतावाद<br>**प्रा. कल्पना एस. गोडघाटे** | ४९-५२ |
| ११ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे राजकीय आणि सामाजिक विचाराद्वारे राष्ट्रबांधणीचे कार्य<br>**डॉ. स्मिता दि. जोशी** | ५३-५६ |
| १२ | जागतिकीकरणातील यांत्रिकीकरण निर्मित बेरोजगारी वृध्दी संकट एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. जयंत एम. बनसोड** | ५७-६१ |
| १३ | तणावमुक्त जीवन कसे जगावे ?<br>**प्रा. सौ. प्रिया श्रीकांत खोरगडे** | ६२-६६ |
| १४ | चंद्रपूर जिल्ह्याचा भौगोलीक व औद्योगिक इतिहास<br>**प्रा. डॉ. रवी एस. सोरते** | ६७-७२ |




Scanned with OKEN Scanner

# ६. संत कान्होपात्रा

**प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे**
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर.

संत कान्होपात्रा हिचा जन्म अंदाजे शके १३९० मध्ये मंगळवेढे या इतिहासप्रसिद्ध गावी झाला. हे गाव पंढरपूरपासून सुमारे ३० कि.मी. अंतरावर आहे. याच गावी संत दामाजी हे प्रसिद्ध संत होऊन गेले. दामाजी हे बीदरच्या बादशहाच्या पदरी रखवालदार होते. एकदा त्या भागात प्रचंड दुष्काळ पडला. गरीब लोक भुकेने तडफडून मरू लागले. दामाजीला ते पाहवले नाही त्याने दुष्काळात सरकारी कोठारातील धान्य गोरगरिबांकडून लुटविले आणि त्यांचे प्राण वाचवले. बादशहाने दामाजीला पकडून आणण्याचा हुकूम काढला. पण त्याच वेळी मंगळवेढ्याच्या विठ्या महाराने लुटवलेल्या पूर्ण धान्याची रक्कम सरकारात जमा केली. त्यामुळे दामाजींने लुटविले नसून ते योग्य भावात लोकांना विकले व सर्व पैसा सरकारात जमा केला असा त्यातून अर्थ निघाला. ''पंढरीच्या विठ्ठलानेच विठ्या महाराचे रूप घेऊन दामाजीपंतांचे प्राण आणि अब्रू वाचविली अशा भावनेने या प्रसंगावर काव्ये रचली गेली आहेत.''१ आणि नाटकेही झाली आहेत. याच मंगळवेढ्यात संत चोखामेळा यांचा मृत्यू झाला. अशा मंगळवेढा या गावी कान्होपात्रा जन्माला आली.

कान्होपात्रा रूपाने अतिशय लावण्यवती होती. तिच्या आईचे नाव श्यामा नायकीन असे होते. श्यामा गणिका होती. कान्होपात्राएवढी सुंदर स्त्री त्यावेळी त्या प्रांतात दुसरी कोणीच नव्हती. कान्होपात्रा तारुण्यात आली तेव्हा एक दिवस तिच्या आईने तिला म्हटले, ''आपण राजवाड्यात जाऊन राजाची भेट घेऊ. तू चांगली सुंदर आहेस. तारुण्याचा बहर तुझ्या शरीरावर कसा मुसमुसतो आहे. राजा तुला पुष्कळ द्रव्य देईल.'' यावर कान्होपात्रा म्हणाली, ''आई! माझ्या योग्य असा पुरुष कोणीच दिसत नाही, हे तू जाणतच आहेस. जो पुरुष माझ्यापेक्षा अधिक रूपवान असेल त्याचीच मी माझा पती म्हणून निवड करीन.''

'पती' हा शब्द ऐकताच श्यामा अस्वस्थ झाली. कारण गणिकेला विशिष्ट पती, घरदार, संसार हे काहीच असत नाही. कोणत्याही तरुणाबरोबर क्रीडा करावी, त्यातून भरपूर पैसे मिळवावेत आणि आयुष्यभर मौज करावी अशीच त्यांची धारणा असते. अर्थात आपला गणिकेचाच व्यवसाय पुढे चालवावा आणि जीवन मजेत घालवावे, संसाराच्या बंधनात तिने अडकू नये असेच श्यामाला वाटत होते आणि तिचे मन वळवण्याचा तिने अनेकदा प्रयत्नही केला होता. पण कान्होपात्राने तिकडे लक्षच दिले नाही. एवढेच नव्हे तर लग्न करून संसार थाटावा असेही तिला वाटेना. ती चिंतनशील होती. तिचे सेवादास्य करणाऱ्या हौसा या म्हातारीमुळे तिला परमार्थाचा ओढा लागलेला होता.

वर्म वैरियाचे हाती । देऊ नको श्रीपती ।।१।।
तू तो अनाथाचा नाथ। दीन दयाळ कृपावंत ।।२।।
वेद पुराणे गर्जती । साही शास्त्रे विवादती ।।३।।



Scanned with OKEN Scanner

चरणी ब्रिद वागविसी । तुझी कान्होपात्रा दासी ।।४।।

पंढरपूरला जाणाऱ्या कितीतरी पालख्या मंगळवेढ्यच्या रस्त्याने जात असतात. एक दिवस मंगळवेढ्यातूनच काही वारकरी टाळ—मृदंग वाजवीत आणि भजन गात पंढरपूरला चालले होते. त्या वारकऱ्यांना कान्होपात्राने नमस्कार केला व विचारले, 'तुम्ही भजन गात गात कुठे निघाला आहात?' 'आम्ही पंढरपूरला जात आहोत.' वारकऱ्यांनी उत्तर दिले. तिची सात्त्विक व प्रेमळ वृत्ती पाहून वारकऱ्यांनी तिला पांडुरंगाचा महिमा सांगितला. उत्कट भावनेने पांडुरंगाला शरण जातो त्याच्या इच्छा विठ्ठल पूर्ण करतो असे सांगून त्यांनी काही उदाहरणेही दिली. आता तिला उत्कटतेने वाटू लागले की आपण पंढरपूरला जायलाच हवे. तिने पंढरपूरला जाण्याचा निश्चय केला. आनंदाने घरी गेली. जुजबी सामान आणि आपली आवडती वीणा घेऊन ती बाहेर पडणार एवढ्यत तिच्या आईने तिला हटकले, 'कुठं निघाली आहेस?' ती म्हणाली, ''माझा निर्णय पक्का झाला आहे. मी पंढरपूरला निघाले आहे.'' आई अवाक् झाली. ती म्हणाली असं वेड्यसारखं काय करतेस? ती म्हणाली, 'माझा निर्णय ठाम आहे.' मग आईला नमस्कार करून ती घराबाहेर पडली. दिंडीत जाऊन मिसळली. दिंडीच्या सोबतीने वाट चालू लागली. वारकऱ्यांनी तिला सांगितले की आमचा पांडुरंग भक्तीचा भुकेला आहे. पिंगला ही तुझ्यासारखी गणिकाच होती. तिचा उद्धार ज्याने केला तो तुझा अंगाकार का करणार नाही. पांडुरंग निश्चितच तुझा अंगीकार करील. या आशेने तिला अधिकच हुरूप चढला.

दिंडीबरोबर चालत असताना वाटेत भक्तिपर अभंग गोड आवाजात रसाळपणे गाऊन तिने सर्वांची मने जिंकली. कान्होपात्राची भजने हे त्या दिंडीचे वैशिष्ट्येच होऊन बसले. कान्होपात्राच्या गोड गळ्यातील अभंगवाणी ऐकण्याकरिता लोक अतिशय उत्सुक असत. तिलाही आपल्या गोड गळ्याचे सार्थक झाले असे वाटून, खूप आनंद होऊन, तिचे मन उल्हासित होई. आता तिच्या विठ्ठलभक्तीची खात्री सर्वांना पटली होती. दिंडी पंढरपूरला आली. मग त्या वारकऱ्यांनी तिला आदराने आणि कौतुकाने पांडुरंगाच्या महाद्वाराशी आणले. तिने तेथेच विठ्ठलाचे प्रसन्न रूप पाहून लोटांगण घातले तिचा आनंद मनात मावेना आपल्या जीवनाचे सार्थक झाले, आपले जीवन धन्य झाले असे वाटून ती पूर्ण समाधानी झाली. तिची निस्सीम भक्ती, विठ्ठल भेटीची आर्तता, अभंगातील अमृततुल्य माधुर्य इत्यादी गोष्टीमुळे तिची ख्याती पंढरपूरच्या परिसरात सर्वत्र पसरली. वारकऱ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या मनात स्वाभाविकच तिने मानाचे व आदराचे स्थान मिळविले होते.

पण मानवी समाजात जसे काही सज्जन स्वभावाचे लोक असतात तसे काही दुष्ट प्रवृत्तीचेही लोक असतात. कान्होपात्राच्या अप्रतिम सौंदर्यावर भाळून काही समाजकंटक तिच्या मागे लागले आणि त्यांनी तिला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. पण तिचे दैव बलवत्तर होते म्हणून या संकटाचा तिच्यावर कुठलाही आघात न होता ती त्यातून सुखरूप मोकळी सुटली. तेव्हा आपले मनोगत साध्य झाले नाही यामुळे चिडून जाऊन त्या लोकांनी एक वेगळाच डाव टाकला. त्यांनी सूड उगवण्याचा प्रयत्न केला. ती बिचारी काय करणार? या छळवादातून सुटकेचा एकच मार्ग तिला दिसत होता आणि तो म्हणजे विठ्ठलाचा धावा करणे. ती विठ्ठलापुढे उभी राहिली आणि त्याची आळवणी करू लागली. आर्त मनाने ती विठ्ठलाला म्हणाली—

पुरविली पाठ न सोडी खळ । अधम चांडाळ पापराशी ।।

वारिता नायके दुष्ट दुराचार । काय करू विचार पांडुरंगे ॥

ती आपल्याला बधत नाही असे पाहून तिला कलंकित करण्याचा त्यांनी एक वेगळाच डाव रचला. ते बेदरच्या बादशहाकडे गेले आणि कान्होपात्राच्या विलोभनीय सौंदर्याचे त्यांनी बादशहाकडे रसभरित वर्णन केले. त्यांनी बादशहाला असेही सांगितले की, कान्होपात्रा ही श्यामा नायकिणीची मुलगी आहे. 'करून सवरून भागली आणि आता देवपूजेला लागली' आहे. तिचे एकुण वर्णन ऐकून बादशहाचे मन विचलित झाले. या वेश्याकन्येला आपण आणलेच पाहिजे आणि तिचे सौंदर्य न्याहाळले पाहिजे असे त्यालाही वाटू लागले. त्याने कान्होपात्राला आपल्याकडे घेऊन येण्याची सेवकांना आज्ञा दिली. बादशहाची आज्ञा घेऊन बादशहाचे सेवक पंढरपुरात येऊन दाखल झाले.

सेवकांनी कान्होपात्राची मंदिरात भेट घेतली. तिला म्हणाले, 'मुकाट्याने आमच्याबरोबर चल. राजीखुशीने आमच्याबरोबर चल, नाही तर आम्हाला तुला बळजबरीने न्यावे लागेल. विचार कर आणि चल. ''त्यांनी तिला हेही बोलून दाखवले की, आपल्याला जर विलंब लागला तर बादशहा क्रोधित होईल. यामुळे त्यांनी तिला त्वरित चालण्याची तयारी करण्याची सूचना केली.'' आता मात्र कान्होपात्राचा धीर सुटत चालला. मोठ्या प्रयत्नाने सांभाळलेल्या पावित्र्याचा चक्काचूर होणार हे भेसूर भविष्य तिला दिसू लागले.''२ तरी निर्धाराने ती म्हणाली, ''ठीक आहे. तुम्ही येथेच थांबा. मी आत जाऊन भगवंताचा निरोप घेऊन येते.'' ती विठ्ठलाजवळ गेली. तिने आर्त वाणीने विठ्ठलाचा धावा केला आणि त्याची करुणा भाकली—

नको देवराया अंत पाहू आता । प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ॥
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलागी जाहले तैसे देवा ॥
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे हो जननी विठाबाई ॥
मोकलूनी आस जाहले उदास । घेई कान्होपात्रेस हृदयात ॥

''ही कान्होपात्रेची प्रार्थना देवाने तत्काळ मान्य केली. तिचे प्राण पांडुरंगाने आपल्या स्वरूपात मिळवून टाकले. साधुसंतांनी त्या साध्वीचे प्रेत देवालयाच्या दक्षिणद्वारी नेऊन पुरले. त्या ठिकाणी पुढे तरटीचा वृक्ष उगवला. तो पंढरपुरी अद्याप दृष्टीस पडतो असे सांगतात.''३

इकडे बादशहाचे शिपाई मंदिराच्या महाद्वारी बसले होते. 'त्यांनी कान्होपात्रा अद्याप येत नाही, असे पाहून ती आत काय करीत आहे' अशी पुजाऱ्यांजवळ विचारणा केली. झालेली सर्व हकिकत पुजाऱ्यांनी त्यांना निवेदन केली. शिपायांना ती खरी वाटली नाही. मग त्यांनी त्या बिचाऱ्या पुजाऱ्यांवर कान्होपात्रेला पळवल्याचा आरोप ठेवून त्यांना सरळ अटकच केली आणि त्यांना घेऊन ते बादशहाकडे आले. त्यांना बादशहापुढे उभे केले. पुजाऱ्यांनी बुका, नारळ, प्रसाद हे सारे बादशहापुढे ठेवले. तेव्हा बादशहाने तो प्रसाद घेतला. प्रसादात एक केस निघाला. हा प्रकार पाहून बादशहास मोठा क्रोध आला. त्यावर पुजाऱ्यांनी सांगितले की हा केस प्रत्यक्ष देवाचा आहे. एवढेच नव्हे तर हे खोटे ठरल्यास आपण आम्हाला वाटेल ती शिक्षा करा. तेव्हा एकंदर प्रकरणाचा खुलासा करून घेण्यासाठी बादशहा स्वत: पंढरपूरला गेला. पांडुरंग कसेही करून

Scanned with OKEN Scanner

आपले रक्षण करीलच करील असा दृढ विश्वास पुजाऱ्यांच्या मनात होता. त्यामुळे पुजारी निश्चिंत व स्वस्थ होते.

''बादशहा पंढरपुरी आल्यावर जेव्हा त्याने श्री विठ्ठलाचे ते मनोहर ध्यान पाहिले तेव्हा त्याच्या मनातला सगळा संशय फिटून तो फार संतोष पावला. त्याने भगवंतास नमस्कार घातला व त्या पुजाऱ्यांस आलिंगून त्यांचा बहुमान केला.''४ 'तिचे प्राण पांडुरंगाने आपल्या स्वरूपात मिळवून टाकले' ही घटना वारकरी खरी मानतात. कारण आपल्या भक्ति सामर्थ्याने संत इच्छामरणी होत असतात, असे त्यांना वाटते.

कान्होपात्राचे फक्त तेवीसच अभंग संत गाथ्यात दिलेले आहेत. कान्होपात्रा माहेरवाशिणीच्या आंतरिक उमाळ्याचे दर्शन घडवते. तिच्या अभंगातून हा उमाळा सहज प्रतिबिंबीत होतो. ''सामान्य गणिका असणारी ही स्त्री कोणाचा आधार नाही, कोणाचेही मार्गदर्शन नाही तरीही केवळ आपल्या अंतःप्रेरणेने विठ्ठलाच्या रंगात रंगून गेली. त्या भक्तिरंगातून चालताना तिची वाङ्मयसंपदा अवतरली. तिने तर आपले कुटुंब, कुटुंबातील सर्वात जवळच्या नातेसंबंधातला जिव्हाळा विठ्ठलातच पाहिला.''

माझे माहेर पंढरी । सुखे नांदु भीमातीरी ।।
येथे आहे मायबाप । हरे ताप दरूशने ।।
निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरीची ।।
कैसी विटेवर शोभली । पाहुनि कान्होपात्रा धाली ।।

कान्होपात्रा गणिका असल्यामुळे लौकिकातील अनेक नाती तिला पारखी झालेली होती. ना तिला रक्षाबंधनाची राखी बांधायला भाऊ होता. ना तिला आपल्या नावापुढे ज्याचे नाव लावावे असे वडील होते. पोरकेपण तिच्या पाचवीलाच पूजलेले होते. अशावेळी तिला हव्या असणाऱ्या नात्यांची पोकळी तिने विठ्ठलाशी नाते जोडून भरून काढली. ''मायबापाकडे माहेरी आलेल्या माहेरवाशिणीसारखी ती पंढरीला येत होती. स्वतःच्या चिंता, दुःख, व्यथा विसरत होती. तिची दुःखाची जातच वेगळी होती.'' तिला अनिच्छेने वावराव्या लागणाऱ्या गणिकेच्या जगात समाजव्यवस्थेच्या चौकटीने तिला बांधून टाकलेले होते. त्यातून बाहेर पडणे केवळ अशक्य होते.

सामान्य स्त्रीला मिळू शकणारे मायबापांचे सुख तिला मिळू शकले नाही. त्यामुळे ती स्वाभाविकच पराकोटीची व्यथित झाली असेल. तिच्या अभंगाच्या मुळाशी ही व्यथा जाणवते. म्हणूनच बेदरच्या बादशहाने तिच्या सौंदर्याची कीर्ती ऐकून तिची अभिलाषा धरली तेव्हा तर तिच्या हृदयाने ठावच सोडला. तिने आपल्या मायबापरूपी विठ्ठलाला मारलेली आर्त हाक आपल्या हृदयाला गलबलून सोडते. 'नको देवराया अंत पाहू आता । प्राण हा सर्वथा जाऊ पाहे।।' 'संत कवयित्रीच्या स्त्री संवेदना' या लेखात डॉ. शोभा पाटील म्हणतात, ''आपली जीवघेणी वेदनाच मायबाप विठ्ठलासमोर मांडून त्याच्या हृदयालाच ती जणू हात घालू पाहते. येथे तिच्या मनातला आर्त स्त्रीभाव असा काही उमाळ्याने अवतरला आहे की, तिचे हे भाव संवेदन मराठी सारस्वतातील एक अमर भावकाव्यच ठरले.''५



Scanned with OKEN Scanner

संत कान्होपात्राने आपल्या आईचा गणिकेचा व्यवसाय सोडून संत मार्गाला जाणारी तिची बंडखोरवृत्ती हा एक स्त्री मुक्तीचा प्रारंभ म्हणावा लागेल. अशा या कान्होपात्राने स्वत:च्या हिंमतीने संत मंडळीमध्ये प्रतिष्ठेचे स्थान मिळविले तसेच पुरुषी वर्चस्वाच्या आदेशाला झुगारून विठ्ठलचरणी लीन झाली. मी [illegible] आहे, पतित आहे, अन्यायी आहे, मुख्य म्हणजे मी यातिहीन आहे, मला आचरण कळत नाही, मला अधिकारही नाही, तरी विठाबाई मला तुझ्या चरणापाशी ठाव दे, ही तिची आर्तता तिच्या सर्व अभंगांना व्यापून आहे. एकूणच सुबोधता, आर्तता आणि आत्मनिष्ठा ही तिच्या अभंगाची वैशिष्ट्ये आहेत.

**संदर्भ टीपा**

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (प्र. संपा.) मराठी विश्वकोश खंड ७ म.रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७७ (पृ. ७२१)

२. शं.भा. गोंधळेकर — श्री संतांच्या नवलकथा सारथी प्रकाशन पुणे १९९९ (पृ. १०५)

३. ज..र. आजगावकर — महाराष्ट संतक कवयित्री भारत गौरव ग्रंथमाला मुंबई १९३९ (पृ. ८१)

४. ज.र. आजगावकर — प्राचीन मराठी संतकवी खंड १ प्रकाशक— ज.र. आजगावंकर, मुंबई १९५७ (पृ. २३४)

५. डॉ. स्नेहल तावरे (संपा.) भारतीय संतांचे योगदान स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २०१५ (पृ. ७७)email-vyankateshpotfode28@gmail.com



## CONTACT FOR SUBSCRIPTION


**AJANTA ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**
**Vinay S. Hatole**
**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004,**
**Cell : 9579260877, 9822620877 Ph: 0240 - 2400877**
**E-mail : ajanta1977@gmail.com Website : www.ajantaprakashan.com**


Scanned with OKEN Scanner